# Lokmat (19 March 2019)

लोकमत



# विद्यार्थ्यांनी घेतले फोटो प्रोसेसिंगचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** एक्सायटिंग सायन्स ग्रुपतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी 'ऐतिहासिक फोटोग्राफी प्रोसेस' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी जुन्या काळातील फोटोग्राफी कशी केली जात असे, त्याची माहिती घेतली.

या कार्यशाळेत विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यात खासगी आणि महापालिका शाळांचा समावेश होता. एस. गिरिकुमार यांनी जुन्या काळातील फोटोग्राफीची माहिती दिली. पूर्वीच्या काळी सायनोटाइप प्रिंटिंग प्रोसेस केली जात असे. ती कशी व्हायची, त्यासाठी काय आवश्यक असायचे याची प्रत्यक्ष माहिती देऊन विद्यार्थ्यांना तसे प्रात्याक्षिक करायला लावले; तसेच फोटोग्राफीचा बदल कसा होत गेला, त्याचा इतिहासही विद्यार्थ्यांनी जाणून घेतला. या ग्रुपच्या सदस्य गायत्री क्षीरसागर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना फोटोग्राफीसाठी लागणारे केमिकल सोल्यूशन, कोटिंग, प्रिटिंग, प्रोसेसिंगची माहिती व्हावी यासाठी कार्यशाळा घेण्यात आली.

डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यानिकेतनचा नववीचा विद्यार्थी महेश बराटे म्हणाला, ''पेपरवर प्रिंटिंग करण्याची कल्पना मला खूप आवडली. फोटो प्रोसेसिंगचे प्रात्याक्षिक करताना नवीन काही तरी शिकायला मिळाले.''

अहिल्यादेवी होळकर स्कूलची सुकन्या सोनवणे म्हणाली, ''छान अनुभव आला. आयसरकडून ही संधी मिळाल्याने आम्हाला जुन्या काळातील फोटोग्राफी शिकायला मिळाली. शाळांमध्ये अशा कार्यशाळा झाल्या पाहिजेत.''